**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JULY-AUGUST, 2022, VOL- 10/72*

# प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. अनिल नारायण निघोट[1] & राजमाने कस्तूर, Ph. D.**

*[1]सहाय्यक प्राध्यापक, डॉ. एम.ए. खान कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्.), मंचर*

**Paper Received On:** 25 AUGUST 2022
**Peer Reviewed On:** 31 AUGUST 2022
**Published On:** 01 SEPTEMBER 2022

***Abstract***

*स्वतःचा सर्वांगीण विकास आणि सामाजिक आवश्यकतांची पुर्ती करून जीवन सफल बनविण्यासाठी मनुष्य जीवनात भावनेस अनन्य साधारण महत्व आहे. आपले कुटुंब, मित्र आणि समाजातील सहज शिक्षण, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणातून मनुष्य आपल्या मनातील भाव-भावना आणि विचारांच्या अभिव्यक्तीसाठी आणि द्विमार्गी संप्रेषणासाठी भाषा व भावनेस अनन्य-साधारण महत्व आहे. साल्वी व मेअर यांच्या मते आपल्या विचार व कृतींसाठी भावनांचा योग्य उपयोग करणे व तसे शिकविणे याचा संबंध भावनिक बुद्धिमत्तेशी असल्याने विद्यार्थी, शिक्षकांची भावनिक परिपक्वता, अभिव्यक्ती, भावना व्यवस्थापन व इतरांच्या भावना समजून घेण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांची (ST) भावनिक बुध्दिमत्ता विकसित झाल्यास व्यक्तीच्या त्याच्या मार्गातील अडथळे सर्वांच्या सहकार्याने दूर करून समाधान व यश मिळते. यासाठी संशोधकाने पेठे, हैद व धर यांच्या चाचणीद्वारे भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेऊन सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठित कार्यक्रमाच्या (CLP) अंमलबजावणीने EQ मध्ये सकारात्मक बदल दिसून आला. संशोधकाने प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जाणून त्याचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.*

***मुख्य संज्ञा :*** *भावनिक बुद्धिमत्ता (EQ), विद्यार्थी शिक्षक (ST)*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात स्वतःच्या पायावर उभे करणारे बी. एड्. विद्यार्थी शिक्षक भावनिकदृष्ट्या सक्षम असावेत. त्यांचे भावनिक पातळीवर स्वतःवर नियंत्रण

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

असावे. भावनिक परिपक्वता, समायोजन क्षमता, तडजोड, जुळवून घेणे ही यशस्वी जीवनास आवश्यक बाब त्यांच्यात विकसित व्हावी. शिक्षकास कुशल नेतृत्वाद्वारे विद्यार्थी व इतर शिक्षकांशी आंतरक्रिया व संघटन कौशल्य विकसनासाठी भावनिकदृष्ट्या सक्षमता गरजेची आहे. दिर्घकाळ आनंददायी आयुष्य जगणे व इतरांना आनंदयुक्त सहभाग देण्यासाठी व बी.एड्. अभ्यासक्रम राबविण्यासाठी वेगवेगळ्या भागातून म्हणजेच शहरी, ग्रामीण तसेच पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व प्रथम व द्वितीय वर्षाचे बी.एड्. प्रवेशित विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता विकसनाची संशोधकास भासली. त्यामुळे संशोधकास अध्यापन कार्य व अध्यापन साहित्याचा वापर करताना प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जाणून त्याचा तुलनात्मक अभ्यास करणे संशोधकास गरजेचे वाटले.

**संशोधनाची गरज**

**1)** भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेतल्यास विद्यार्थी शिक्षक व त्यांच्या भावी विद्यार्थ्यांनाही पुढील कारकिर्दीत भावनिक बुद्धीमत्ता माहित झाल्याने त्याचा उपयोग होईल.

2) हे विद्यार्थी शिक्षक मनाप्रमाणे न घडल्यास किंवा एखादे काम पुन्हा करावे लागल्यास एकदम अस्वस्थ बनून एकाकी बसणे, आजारी पडणे असे प्रकार वाढतात. (चव्हाण- 1999, पीएच.डी.)

3) विद्यार्थी शिक्षकांवर कामाचा ताण वाढल्यास भावनिकदृष्ट्या संतुलन बिघडल्याने नको ती कृती घडते. (गोलमन- 1995)

4) संशोधकास भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेणे अध्यापन सुलभतेसाठी, दर्जेदार कामासाठी गरजेचे वाटते. (अवचर- 2010, पीएच.डी.)

5) काही शालेय विद्यार्थीही एकलकोंडे, स्मार्टफोन-गेम्स, व्यसनात गुरफटलेले दिसतात व पाहिजे ते मिळाले नाही तर विध्वंसक प्रवृत्ती वाढते यावर हे बी.एड्. विद्यार्थी शिक्षक त्यांच्या सर्वच भावी विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता जाऊन घेऊन त्यांच्या अध्ययनासाठी स्वनियंत्रण शिकवतील. (तावरे- 2010, पीएच.डी.)

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## संशोधनाचे महत्व

**A. प्राध्यापक**

**1)** प्रस्तुत संशोधनातून प्राध्यापकास भावनिक बुद्धिमत्ता कमतरतेमुळे मागे पडलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मिळेल.

2) सदर संशोधनातून प्राध्यापकांस भावनिक बुद्धिमत्ता जाणून तुलनात्मक अभ्यास करता येईल.

3) सदर संशोधनातून प्राध्यापकास भावनिक बुद्धिमत्ता जाणून व त्याच्या विकसनासाठी उपाययोजना करता येतील.

B. विद्यार्थी शिक्षक :

1) सदर संशोधनातून प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांस आपली भावनिक बुद्धिमत्ता किती आहे, हे समजेल व त्यातून भावनिक बुद्धिमत्ता विकसनाचे महत्व समजेल.

2) सदर संशोधनातून प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करून उपाययोजनेचे महत्व समजेल.

**C. भावी विद्यार्थी**

**1)** भावनिक बुद्धिमत्तेच्या तुलनात्मक अभ्यास व उपायांमुळे भावी विद्यार्थ्यांतील एकलकोंडेपणा कमी होऊन स्व-ओळख, स्व-नियंत्रण, स्व-संवेदना वाढेल.

2) घातक व्यसने, गेम्स, स्मार्टफोन, टी.व्ही. यांचा ओढा कमी होऊन अध्ययनाची गोडी वाढेल.

## समस्या शीर्षक

प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास**.**

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

**1)** शिक्षक शिक्षणसंस्थेतील विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता शोधणे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

2) प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

3) प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन परिकल्पना**

प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक आढळून येईल.

**शून्य परिकल्पना :** प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक आढळून येत नाही.

**पूर्व संशोधनाचा आढावा:**

या संशोधन अभ्यासासाठी पाटील नलिनी (2007), जोशी सुप्रिया (2003), तावरे मनिषा (2010), बोराटे मनोज (2010), अवचर सीमा (2010), खानविलकर कल्याणी (2011), काळे भाऊसाहेब (2017), हेरकळ सुरेंद्र (2019), पाटील प्रणिता (2016), कांबळे केतन (2021) यांच्या पूर्व संशोधनांचा अभ्यास केला. तर भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेऊन तुलनात्मक अभ्यासासाठी नाईक संजय (2001) भावनिक बुद्ध्यांक व भावनिक बुद्धिमत्ता, सिंह दलिप (2008) भावनिक बुद्धिमत्ता, आलेगावकर प.म. (2000) प्रगत क्रीडा मानसशास्त्र सदर संदर्भ ग्रंथ व पूर्व संशोधनांचा अभ्यास करण्यात आला. यावरून असे आढळून आले की, भावनिक बुद्धिमत्ता या घटकांवर संशोधन झाले आहे. पण प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जाणून त्याचा तुलनात्मक अभ्यास संशोधकास आढळला नाही.

**संशोधन कार्यपद्धती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, नगर व नाशिक येथील 134 तुकड्या व 110 महाविद्यालयांतून प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येकी चार अध्यापक महाविद्यालयांतील सर्व तुकड्यांतील प्रत्येकी 50 अशा 550 बी.एड्. प्रशिक्षणार्थींची निवड कोणताही पक्षपात न

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

करता जनसंख्येतील सर्वच घटकांना निवडीची समान संधी देणाऱ्या संभाव्यता आधारित लॉटरी पद्धतीने निवड केली.

संशोधकाने प्रथम पेठे, हैद व धर यांच्या प्रमाणित भावनिक बुद्धिमत्ता चाचणी ज्याची विश्वसनीयता 0.86 आहे व मापन विधानांना पूर्णतः सहमत (5), सहमत (4), अनिश्चित (3), असहमत (2), पूर्णतः असहमत (1) अशी 34 विधाने या चाचणीत आहेत. या प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थी शिक्षकांची पेठे, हैद व धर यांच्या प्रमाणित भावनिक बुद्धिमत्ता चाचणीने सर्वेक्षण पद्धतीने भावनिक बुद्धिमत्ता विषयक पूर्व चाचणी घेतली व त्याचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास केला. अशा सर्वेक्षण व तुलनात्मक द्विपद्धतींचा संशोधकाने प्रस्तुत संशोधनात वापर केलेला आहे.

प्रथम व द्वितीय वर्ष या दोन्ही गटांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी घेऊन भावनिक बुद्धिमत्ता चाचणीद्वारे फरक जाणून घेतला.

**सांख्यिकी विश्लेषण**

134 तुकड्या व 110 महाविद्यालयांतून प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येकी चार अध्यापक महाविद्यालयांतील सर्व तुकड्यांतील प्रत्येकी 50 अशा 550 प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणीतील प्राप्तांकांची केंद्रीय प्रवृत्ती, विचलनशीलता व t value

**550 प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड. विद्यार्थी शिक्षक भावनिक बुद्धिमत्ता चाचणीचे तुलनात्मक विश्लेषण**


| Students Categories | Students | Mean | S.D. | T Value |
|---|---|---|---|---|
| All 1st Year | 251 | 136 | 14.8 | 5.241 |
| All 2nd Year | 299 | 142.67 | 12.33 | |

सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त t-value i.e. 5.241 (df = 49) ही table t-value 2.00 पेक्षा जास्त असल्याने 0.05 सार्थकता स्तरावर सार्थ आहे. याचा अर्थ शून्य परिकल्पनेचा त्याग केला व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. तसेच If P value < α

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

= 0.05, then Reject H0 Here, P = 0.00 < α = 0.05 याचा अर्थ शून्य परिकल्पनेचा त्याग केला व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. म्हणजेच प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास केला असता प्रथम वर्षापेक्षा द्वितीय वर्ष विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जास्त असल्याने प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत फरक आढळला.

**प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थी शिक्षक भावनिक बुद्धीमत्ता दर्शविणारा आलेख**




## निष्कर्ष

**1.** प्रथम वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचे मध्यमान 136 तर द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान 142.67 आहे.

2. या विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्ता चाचणीवरून द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता प्रथम वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या तुलनेत अधिक आढळते.

3. प्राप्त t-value i.e. 5.242 (df = 49) ही table t-value 2.00 पेक्षा जास्त असल्याने 0.05 सार्थकता स्तरावर सार्थ आहे. म्हणजेच प्रथम व द्वितीय वर्ष बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक आढळला.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## चर्चा

550 प्रथम व द्वितीय बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता चाचणी नंतर प्रथम व द्वितीय बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करता भावी शिक्षक म्हणून काम करणार असलेल्या विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जाणून तुलनात्मक अभ्यासातून भावनिक बुद्धिमत्ता विकसनाची गरज संशोधकास दिसून आली.

प्रथम व द्वितीय बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्तेची तुलना करता प्रथम वर्ष विद्यार्थी नव्याने प्रवेशित झाले असून बी.एड्. अभ्यासक्रम एकमेकांच्या सांघिक, गट, सहकार्यावरच अवलंबून असल्याने या विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता अजून विकसित करणे संशोधकास गरजेचे वाटले. यासाठी सहकार्यात्मक, पर्यवेक्षित, गट, सांघिक अध्यापन व अध्ययनाची उपाययोजना केल्यास भावनिक बुद्धीमत्ता विकसनात भर पडून अध्ययनास मदत होईल, असे संशोधकास वाटते.

## संदर्भसूची

*आगाशे, ललिता (2010) सहकार्यात्मक अध्ययन: गट अध्यापन (प्रथम आवृत्ती) पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन*

*आलेगावकर, प.म. (2000) प्रगत क्रिडा मानसशास्त्र. पुणे : कॉन्टीनेन्टल प्रकाशन*

*बापट, भा.गो. (1996) मूल्यमापन आणि संख्याशास्त्र. पुणे : व्हिनस प्रकाशन*

*भिंताडे, वि. रा. (2009) शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नित्यनूतन प्रकाशन*

*सिंह, दलिप (2005) भावनिक बुद्धिमत्त-एक व्यवसायिक मार्गदर्शन (प्रथम आवृत्ती) पुणे : डायमंड पब्लिकेशन*

*https://positivepsychologyprogram.com (06/09/2022)*
*लेख : What is Emotional intelligence and how to improve it?*

*https://www.ihhp.com (07/09/2022)*
*लेख : What is Emotional intelligence, Daniel Goleman*

*https://study.com (08/09/2022)*
*लेख : What is cooperative learning?- definition & methods.*

*www.behavioradvisor.com (09/09/2022)*
*लेख : Cooperative learning in the classroom : How to do it?*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*